# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०३/२०१३

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक ०७/०३/२०१३ रोजी सभा सुचना क्र. ०६ दि. ०२/०३/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. राजु यशवंत भोईर हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

१. श्री. राजु यशवंत भोईर
२. श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद
३. श्रीम. अनिता जयवंत पाटील
४. श्री. बर्नड आल्बर्ट डिमेलो
५. श्री. मुन्ना सिंह
६. श्री. प्रमोद जयराम सामंत
७. श्री. राजेश शंकर वेतोसकर
८. श्री. रोहिदास शंकर पाटील
९. श्री. शरद केशव पाटील
१०. श्रीम. मिरादेवी यादव
११. डॉ. राजेंद्र जैन
१२. श्री. संदिप मोहन पाटील
१३. श्री. प्रविण मोरेश्वर पाटील
१४. श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी
१५. डॉ. रमेश जैन

**गैरहजर सदस्य –**

१.) श्रीम. बगाजी शर्मिला विल्सन

**मा. सभापती :-**

नमस्कार, सर्व स्थायी समिती सदस्यांचे हार्दिक स्वागत. आणि सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**प्र. नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा गुरुवार दि. ०७/०३/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०६, दि. ०२/०३/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ४१, मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेले मोबाईल टॉयलेट मागणीनुसार भाड्याने देणेबाबत निर्णय घेणे.

**रोहिदास पाटील :-**

मोबाईल टॉयलेट किती आहेत?

**दिपक खांबित :-**

दोन आहेत.

**रोहिदास पाटील :-**

दोन्ही वापरणे योग्य आहे?

**दिपक खांबित :-**

दोन्ही आताच रिपेअरींग केले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

आले होते कधी?

**दिपक खांबित :-**

साहेब, ते एम.एम.आर.डी.ए मार्फत आले होते. २००९ मध्ये.

**रोहिदास पाटील :-**

२००९ मध्ये आले. तर किती सालापर्यंत चालले?

**दिपक खांबित :-**

४ वर्ष साहेब.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही हे दुरुस्त केले ना. दुरुस्त करायच्या आधी बंद पडले होते. तर ते बंद किती वर्षे पडले होते?

**दिपक खांबित :-**

साहेब, हे टॉयलेट जे आहे. ते एम.एम.आर.डी.ए स्किममध्ये आपण शौचालय बांधली तिकडे पर्यायी व्यवस्था म्हणून आपल्या एम.एम.आर.डी.ए. फंडाने घेतलेली आहे. आपल्या फंडातुन घेतलेली नाही.

**रोहिदास पाटील :-**

मी फंडाच म्हणत नाही. ज्या तारखेपासून आली त्या तारखेपासून ...............

**दिपक खांबित :-**

३ वर्ष वापरली गेली.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही काहीतरी चूकीच सांगता. आल्याची तारीख तुमच्याकडे आहे?

**दिपक खांबित :-**

आहे ना २००९.

**रोहिदास पाटील :-**

२००९ ला कधी आले?

**दिपक खांबित :-**

२००९ मध्येच आहे.

**रोहिदास पाटील :-**

जानेवारी मध्ये आले की, डिसेंबर मध्ये आले?

**दिपक खांबित :-**

सगळी डिटेल नाही आणली मी.

**रोहिदास पाटील :-**

तेच सांगतो मी २००९ च्या अखेरीला आणल ना. २०१०-११ चालल, २०१२-१३ बंद राहिल. २०१३-१४ ला चालू करायला चाललो. आता आपण दुरुस्तीचा खर्च किती केला?

**दिपक खांबित :-**

३ लाख रुपये.

**रोहिदास पाटील :-**

३ लाख रु. दुरुस्तीला खर्च केला. आणि आता आपण दुस-याच्या ताब्यात देणार की फक्त भाड्याने देणार?

**दिपक खांबित :-**

हे आपण भाड्याने देणार आहे.

**रोहिदास पाटील :-**

भाड्याने एक व्यक्तिगत माणुस मागणार त्याला तुम्ही भाडे लावणार की, एखादी संस्था मागवून रोजचे ३ हजार रु. भाडेप्रमाणे देणार?

**दिपक खांबित :-**

संस्थेला देणार. सार्वजनिक कार्यक्रमाकरिता सार्वजनिक कार्यक्रम जो असतो त्या करिता देणार. नाहीतर असेच ठेवणार. समजा, जर कुठे लागले तर आपण वापरणार.

**रोहिदास पाटील :-**

ज्या ठिकाणी संडास, मुतारीची गैरसोय होते अस तुमच्या लक्षात आल आहे. त्या ठिकाणी ठेवण गरजेच आहे.

**दिपक खांबित :-**

कालच एक शौचालय मिरादेवी यादव त्यांच्या वार्डमध्ये जी स्किम चालू आहे. आदिवासी लोक आहेत. तिकड शौचालय नाही म्हणून कालच ठेवल. पर्यायी व्यवस्था म्हणून.

**रोहिदास पाटील :-**

त्याचसाठी म्हणतो, तुम्हाला भाड मिळायला लागल.

**दिपक खांबित :-**

रिकामी असतील तरच भाड्याने देणार.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही जो कॅम्प बनवला. तिथे संडास, मुताऱ्यांची व्यवस्था नाही. तिथे एकतरी संडास, मुतारीसाठी ठेवा तस आयुक्त साहेबांकडे आम्ही विनंती केली होत आता भाड्याचा विषय आल्यानंतर दोन्ही जर एखाद्या कुठल्या संस्थेने घेतली तर तुम्ही पाठवणार नाही.

**मिरादेवी यादव :-**

अभी भी जो शौचालय बनाया है। ठेकेदार या कोई बनाऐंगे, तो अभी कितना ३-४ महिना हो गया होगा। कही टाकी लिकेज, कही इधर भरा, कही उधर भरा।

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब, माझी तुम्हाला विनंती आहे की, जी लोक राहतात त्यांची व्यवस्था आपण करु शकत नाही. ते जे काही कार्यक्रम आयोजित करतात त्यांची आपण व्यवस्था भाडे घेऊन करायच. ते एकच दिवस घेतील. त्यांचा कार्यक्रम एक दिवसाचा. ते आदल्या दिवशी नेतील. आदल्या दिवसाच भाडे देतील की नाही ते माहित नाही. येईपर्यंत दुसऱ्यांना आपण देऊ शकत नाही. ती लोक जी आहेत त्यांना दोन्ही टॉयलेटची नाहीतर ६ टॉयलेटची आवश्यकता असणार. म्हणून ह्याची गरज आहे. महापालिकेच उत्पन्न ही होत असेल. विरोध करायच काही कारण नाही. हा एक भाग झाला. पण गरजवंतांना आपण देत नाही. आणि दुसऱ्या ठिकाणी देतो. तुम्ही एकाला भाड दिल की त्यांना देऊ शकणार नाही. जस काल तुम्ही नेऊन दिल ते बुक झाल असे ४ पाहिजे. आणि आपल्याकडे दोनच आहे. मग हा ठराव कशाला आणला. वास्तविकता सोडून हा ठराव आला का? तुम्ही सद्‌बुध्दीने हा ठराव आणावा आणि सद्‌बुध्दीने तुम्ही त्याच्यावर निर्णय घ्यावा. आपल ठाम मत आहे की, जे उपभोगता आहे त्यांना गरज आहे. तिथे आपण दुसरी व्यवस्था करु शकलो नाही की, करत नाही. आणि भाड कुठे पण देतो. त्याची प्रतिक्रिया काय होईल. जे काय महिन्याचे पर डे ३००० रु. आपल्याला मिळणार नाही. एक वेळ जाईल किंवा दोन वेळ जाईल. आणि त्याचे तुम्ही बुक केल तर जे गरजवंत असतील त्यांना तुम्ही देऊ शकणार नाही.

**बर्नड डिमेलो :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. प्रश्न असा आहे की, प्रत्येक ठिकाणी एम.एम.आर.डी. नी शौचालय बनवलेली आहेत. पे ॲन्ड यूज ती झालेली आहेत. आपली स्वतःची आहेत. आणि घराघरात झाली आहे ते अलग. फक्त काही लोकांनी गाव आणि वस्त्या उभ्या केल्या तिथे प्रसंग येतात. राहिली गोष्ट तुम्ही सणासुदीच सांगता, तशाप्रकारे आणल्या. इथे जत्रा असेल तर त्याची गरज भासते. बाकी एरवी तिथे पडून आहे. आणि भाडे वाढणे. लग्न समांरभ असो किंवा कोणत्या शाळेचा प्रोग्राम असो, कोणाचा उद्‌घाटन सोहळा असो त्या ठिकाणी जर भाड्याने मागत असतील आणि २ पैसे आपल्या महापालिकेला भेटत असतील तर काय आहे त्याच्यात............

**रोहिदास पाटील :-**

आमचा महापालिकेला उत्पन्नाचा काही विरोध नाही. मिरादेवी आणि मी आम्ही आयुक्त साहेबांना भेटून जो ट्रान्झिस्ट कॅम्प तुम्ही बनवला त्या ठिकाणी ही आपण सुविधा दिलेली नाही.

**बर्नड डिमेलो :-**

काका, तुम्ही जागा उपलब्ध करा. तिथे बांधण्यात येईल.

**दिपक खांबित :-**

आंबेडकर नगरला कस आहे. तिथे सार्वजनिक शौचालय बांधुन देत नाही दोन्ही ठिकाणी. म्हणून तिकडे आपण मोबाईल टॉयलेट घेऊन गेले, सुरु पण केले. साहेब, जिकडे आवश्यकता आहे तिथे आपण बांधतो ना.

**रोहिदास पाटील :-**

दिल्याबद्दल तुमच अभिनंदन करतो.

**दिपक खांबित :-**

तुम्ही बोलता ना. तुमच्या मुद्दयाप्रमाणे जिथे-जिथे आवश्यकता असेल त्याची मागणी असेल तिकडे आपण शौचालय बांधतो ना पे ॲन्ड यूज वरती.

**रोहिदास पाटील :-**

मी बांधायचा प्रश्न नाही बोलत. ज्या ठिकाणी तुम्हाला द्यायच आहे त्या ठिकाणी तुम्ही दिल नाही. तिथे द्या.

**दिपक खांबित :-**

कुठे द्यायच तुम्ही सांगा ना.

**रोहिदास पाटील :-**

ट्रान्झिस्ट कॅम्पला नाही आहे ना.

**दिपक खांबित :-**

ट्रान्झिस्ट कॅम्पला आहे. त्यांच म्हणन अस आहे की, आहे ते लिकेज आहे. आणि कमी पडत असेल तर आपण तिकडे बांधून घेऊ.

**रोहिदास पाटील :-**

बांधुन घ्या पण बांधेपर्यंत ठेवा ना.

**संदिप पाटील :-**

आता जे शौचालय दिलेले आहे आंबेडकर नगर आणि भोलानगरला ते नविन पध्दतीची आणि चांगल्या सुखसोयीचे आहे.

**रोहिदास पाटील :-**

ही पण चांगलीच आहे म्हणतात ना.

**दिपक खांबित :-**

चांगली आहे ना.

**रोहिदास पाटील :-**

चांगली आहे की, नुसती रंग लाऊन आहे.

**संदिप पाटील :-**

त्यांची कार्यपध्दती चांगली आहे. आम्ही तिथे एक माणूस नेमला आहे. ठेकेदारकडे कसा एक मनुष्य असतो तसा एक मनुष्य ठेवला आहे. त्या पध्दतीने तो साफसफाई करतो. आणि जे काही पैसे असतील तर तो कवर करतो.

**दिपक खांबित :-**

जिथे आवश्यक आहे तिथे ..........................

**शरद पाटील :-**

खांबित साहेब, काका जे बोलतात ना तुम्हाला सगळ समजत. पण तुम्हाला समजल नाही असे तुम्ही करता. आता तिथे तुमच कॅम्प आहे. तिथे ते कंम्पलसरी राहिल आणि ते तुम्ही कोणाला बुकींग केल आणि दिल तर त्यांनी त्यावेळेला कुठे जायच?

**दिपक खांबित :-**

राहणार नाही ना. ट्रान्झिस्ट कॅम्पला आपण ही शौचालय बांधलेली आहे. त्याच्यामध्ये मॅडमची कंम्पलेन्ट आहे की लिकेज वैगेरे आहे. शौचालय आता बांधलेली आहेत तर ती करुन घ्या. त्याची तिकडे नविन शौचालय वाढीव ठेवा ही मागणी नाही. आणि आता जी आपण टेम्पररी जनता नगरला ठेवली आहे .......................

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती महोदय, तुम्ही ठराव केला. आम्हाला का महापालिकेला उत्पन्न येते. आम्हाला विरोध करण्याच काही कारण नाही. पण गरज असली शौचालय असल. तर तुम्ही नाही सांगु शकणार नाही. ठरावानुसार आम्हाला भाड्याने द्यायला लागते. ती तरतुद करा. तसा ठराव करा. ज्या ठिकाणची वास्तविक गरज असेल त्यांची खात्री पटली तर हे शौचालय तिथे पोचल पाहिजे. कारण तुम्ही बनवू शकत नाही, देऊ शकत नाही. बनत असेल तर ते वागग्रस्त जागेवर असेल.

**बर्नड डिमेलो :-**

काका, आता दोन ठेवले आहेत. तर चार ठेवू. गरज असेल ना तर ठेऊ ना.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मिरा भाईंदर नगरपालिका में ऐसे कितने प्रसंग हूए, जहाँ पे शादी ब्याह होती है। सामने ग्राऊंड के अंदर शौचालय की व्यवस्था नही थी। और ऐसे मेरे खुदने सात साल से अनुभव देखा है। जहाँ पे मोबाईल टॉयलेट की आवश्यकता पडती है। यह बात सही है की, इतना बडा मिरा भाईंदर महानगरपालिका है। उसमे अगर कई सार्वजनिक कार्यक्रम होते है, और सार्वजनिक शौचालय की मोबाईल व्यवस्था नही होती है। और अगर होती है तो बहुत अच्छी बात है। पर इसमे मेरा ऑब्जेक्शन क्या है की, इसमें आपने लिखा है की, उसको स्वयंमको लेके जाना पडेगा। टॉयलेट की, पानी की विद्युत की व्यवस्था उसको खुदको करनी होगी। इसे क्या होगा एक तो अपुन फॅसीलिटी दे रहे है। वह हाफ फॅसीलिटी दे रहे है। उसको इतना होना चाहिए। वन विन्डो सिस्टम मिलना चाहिए। यहाँ से मोबाईल टॉयलेट मिलेगा, इतना पैसा भरेगा। और वापीस लाना, ले जाना उसके अंदर अपना आदमी रहे। जनरेटर है, मेन्टेन करे, पानी रखे। अगर अपना पानी नहीं रखा तो वह लोग गंदा करते है। आधे घंटे के बाद इतना बदबू आता है की, दुसरा कोई युज नहीं कर सकता है। उसके अंदर अपना आदमी रहना चाहिए। जनरेटर रहे। भाडा रखा है। जो ३ हजार रु. भाडा रखा है, वह बिजनेस हो गया है। थोडासा यह फॅसिलिटी है। आज मिरा भाईंदर नगरपालिका में आम आदमी के घरपर प्रसन्न हो। हम क्या फॅसिलिटी देते है? उसके लिए अपना आदमी हो, पानी अपना हो जनरेटर अपना हो और उसका चार्ज थोडा कम करना चाहिए।

**दिपक खांबित :-**

जनरेटर नहीं है। यह संस्थावाले है ना, वह लाख-लाख, दो-दो लाख का मैदान लेते है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

जिम्मेदारी अपने ही रखेंगे तो अच्छा रहेगा नहीं तो बोलेंगे खराब हो गया। फिर वह पडा रहेगा। पैसे वसुल कर रहे है। वह चिज पेंडींग रह जाएगी।

**बर्नड डिमेलो :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने एमएमआरडीए कडील निर्मल एम.एम.आर योजनेंतर्गत मोबाईल टॉयलेट खरेदी केलेले होते. सदर मोबाईल टॉयलेट वापरामुळे नादुरुस्त झालेले होते. सदर दोन्ही मोबाईल टॉयलेट सद्यस्थितीत दुरुस्ती करुन घेण्यात आलेले असून सुभाषचंद्र बोस मैदानात ठेवण्यात आलेले आहे.

सदर मोबाईल टॉयलेट ची सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या कोणत्याही ठिकाणी आवश्यकता नाही. सदर मोबाईल टॉयलेट खाजगी कार्यक्रमाकरीता भाडयाने मागणी करण्यात येते. त्याकरीता भाडे व अनामत रक्कम ठरवून मागणीनुसार भाडयाने दिल्यास त्यांचा वापर होऊन देखभाल दुरुस्तीचा खर्च निघू शकेल. सदर मोबाईल टॉयलेट भाडयाने देणेसाठी खालीलप्रमाणे भाडे व अनामत रक्कम ठेवणे आवश्यक आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | खाजगी शाळा, संस्था यांचे कार्यालयास भाडयाने देणे. | रु. ३०००/- प्रति दिन (८ तास) प्रति नग |
| | अनामत रक्कम | रु. १०,०००/- |

तसेच खालीलप्रमाणे अटीशर्ती ठेवण्यात याव्यात.

१. सदर मोबाईल टॉयलेट संबंधितांनी स्वतः ट्रॅक्टर अथवा डंपर ने टोचन करुन घेऊन जाणे व मुदतीत परत त्याच जागेवर आणणे.
२. पाण्याची व विद्युत व्यवस्था संस्थेस स्वतः करावी लागेल.
३. मोबाईल टॉयलेटचे नुकसान केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल तसेच अनामत रक्कमेपेक्षा जादा होणारा दुरुस्ती खर्च संस्थेने भरणे बंधनकारक राहील.

वरील प्रमाणे अटीशर्ती व भाडे, अनामत रक्कम घेऊन मोबाईल टॉयलेट भाडयाने देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**प्रमोद सामंत :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ४१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेले मोबाईल टॉयलेट मागणीनुसार भाड्याने देणेबाबत निर्णय घेणे.

**ठराव क्र. ३७ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने एमएमआरडीए कडील निर्मल एम.एम.आर योजनेंतर्गत मोबाईल टॉयलेट खरेदी केलेले होते. सदर मोबाईल टॉयलेट वापरामुळे नादुरुस्त झालेले होते. सदर दोन्ही मोबाईल टॉयलेट सद्यस्थितीत दुरुस्ती करुन घेण्यात आलेले असून सुभाषचंद्र बोस मैदानात ठेवण्यात आलेले आहे.

सदर मोबाईल टॉयलेट ची सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या कोणत्याही ठिकाणी आवश्यकता नाही. सदर मोबाईल टॉयलेट खाजगी कार्यक्रमाकरीता भाडयाने मागणी करण्यात येते. त्याकरीता भाडे व अनामत रक्कम ठरवून मागणीनुसार भाडयाने दिल्यास त्यांचा वापर होऊन देखभाल दुरुस्तीचा खर्च निघू शकेल. सदर मोबाईल टॉयलेट भाडयाने देणेसाठी खालीलप्रमाणे भाडे व अनामत रक्कम ठेवणे आवश्यक आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | खाजगी शाळा, संस्था यांचे कार्यालयास भाडयाने देणे. | रु. ३०००/- प्रति दिन (८ तास) प्रति नग |
| | अनामत रक्कम | रु. १०,०००/- |

तसेच खालीलप्रमाणे अटीशर्ती ठेवण्यात याव्यात.

१. सदर मोबाईल टॉयलेट संबंधितांनी स्वतः ट्रॅक्टर अथवा डंपर ने टोचन करुन घेऊन जाणे व मुदतीत परत त्याच जागेवर आणणे.
२. पाण्याची व विद्युत व्यवस्था संस्थेस स्वतः करावी लागेल.
३. मोबाईल टॉयलेटचे नुकसान केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल तसेच अनामत रक्कमेपेक्षा जादा होणारा दुरुस्ती खर्च संस्थेने भरणे बंधनकारक राहील.

वरील प्रमाणे अटीशर्ती व भाडे, अनामत रक्कम घेऊन मोबाईल टॉयलेट भाडयाने देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४२, राजीव आवास योजनेअंतर्गत संक्रमण शिबीर बांधणे या पथदर्शी प्रकल्पासाठी तांत्रिक सल्लागार नेमणेच्या निविदास मान्यता देणे.

**दिपक खांबित :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकास आराखड्यामध्ये ट्रान्झिस्ट कॅम्प करिता म्हणजे संक्रमण शिबिराकरिता आरक्षण नव्हत. त्यानंतर आपण मा. महासभेमध्ये विषय आणला. त्यामध्ये धोकादायक बिल्डींग आहेत. ह्या जे तोडताना त्या लोकांना कुठे ठेवायचा हा प्रॉब्लेम व्हायचा. म्हणून आपण घोडबंदरच आरक्षण आहे ट्रक टर्मिनल ह्याच्यामध्ये चार एकर मध्ये आपण संक्रमण शिबिराच आरक्षण टाकल आणि ते आरक्षण मंजुर झाल. चार एकरच तर त्या जागेमध्ये आपल्याला ट्रान्झिस्ट कॅम्प बांधायच आहे.

**प्रमोद सामंत :-**

बांधलेला आहे ना.

**दिपक खांबित :-**

नाही. बांधायचा आहे. बी.एस.यू.पी. च नाही म्हणत मी. हा आपला महानगरपालिकेचा परमनन्ट ट्रान्झिस्ट कॅम्प २६९ स्क्वेअर फूटची ही सगळी घरे आहेत. एक हजार आपल्याला तिकडे घर बांधायची आहेत. याकरिता केंद्र शासनाची जी योजना आहे. राजीव आवास योजना याच्यामध्ये आपल्याला १०० टक्के पैसे मिळणार आहेत. फक्त तिकडचे रस्ते, गटारे वैगेरे होती. तो फक्त आपल्याला करायचा आहे. बाकी पथदर्शी प्रकल्प म्हणून हा कार्यक्रम प्रोजेक्ट आपल्याला मंजूर करुन घ्यायचा आहे. जवळ जवळ ९० कोटीचा प्रकल्प आहे. त्यांच्याकडून आपल्याला पैसे मिळणार. पण त्याकरिता आपल्याला प्रोजेक्ट रिपोर्ट करुन तो केंद्र सरकारला सादर करायचा आहे. तर ते प्रोजेक्ट रिपोर्ट करण्याकरिता टेंडर काढलेले आहे.

**प्रविण पाटील :-**

खांबित साहेब, तुम्ही सांगितल राजीव आवास मधुन १०० टक्के मिळणार. आणि ती मिळणार आहे ती ह्या योजनेसाठी मिळणार आहे का की, आपण आपल्यासाठी वापरणार आहोत?

**दिपक खांबित :-**

हे फक्त ट्रान्झिस्ट कॅम्पसाठी मिळणार आहेत.

**प्रविण पाटील :-**

ट्रान्झिस्ट कॅम्पचा उपयोग राजीव आवास योजनेसाठी करणार आहोत की, धोकादायक इमारतीमध्ये करणार आहोत?

**दिपक खांबित :-**

ट्रान्झिस्ट कॅम्पला येईल. त्याचा वापर कसा करायचा हे मा. महासभा ठरवेल. आपल्या समोर जे आहे ना.

**प्रविण पाटील :-**

ट्रान्झिस्ट कॅम्पमध्ये धोकादायक इमारतीसाठी आहे की नुसती झोपडपट्टीमध्ये आहे.

**दिपक खांबित :-**

१०० टक्के उपयोग धोकादायक बिल्डींगवर प्रस्ताव आहे.

**प्रविण पाटील :-**

त्याच्यासाठी १०० टक्के अनुदान मिळेल का ?

**दिपक खांबित :-**

धोकादायक इमारती मधल्या लोकांना ...................

**प्रविण पाटील :-**

आता जे अनुदान मिळणार आहे. १०० टक्के आपल्याला, तर ते कशासाठी वापरणार आहोत ?

**दिपक खांबित :-**

संक्रमण शिबिरसाठी.

**प्रविण पाटील :-**

संक्रमण शिबिर कोणाच ?

**दिपक खांबित :-**

धोकादायक इमारतीच.

**प्रविण पाटील :-**

ते त्याच्यासाठी मिळणार आहे का? राजीव आवास योजने अंतर्गत.

**दिपक खांबित :-**

त्याचा प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करायचा आहे.

**प्रविण पाटील :-**

दोन बाबी तुम्ही मिक्स करता.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही निवेदन करते वेळी स्पष्ट निवेदन करा किंवा आपल्या ठरावामध्ये स्पष्ट ॲड करा. कि हे धोकादायक इमारती साठीच आहे. अन्य उपयोग करू की नाही अस तुम्ही कराल बोलले तर ती तरतुद ठेवूच नका. वाटा फुटतील. काल तुम्ही नव्हते अनेक धोकादायक इमारती तुम्ही खाली केल्या आणि ते लोक रस्त्यावर आले. आणि जरी त्यांना होते असे सांगितले तर जागेवर जावून तरी बसतील त्यामुळे आपल म्हणन अस आहे की, हे फक्त धोकादायक इमारती मध्ये राहण्या-या लोकांसाठीच अन्य बोलूच नका.

**दिपक खांबित :-**

मी अन्य अशाकरिता बोललो की, कुठे आपला रस्ता रूंदीकरणामध्ये कोणाचा गाळा वगैरे जात असेल तर तो रस्ता आपल्याला १००टक्के लगेच व्यवस्था करू शकतो. त्याला टी.डी.आर किंवा बेनीफिट जागेची किंमत घेईपर्यत आपण त्याला तिथे ठेवू शकतो.

**प्रविण पाटील :-**

आपण जो अनुदान मागणार आहोत ते ट्राझिस्ट कॅम्पसाठी त्याचा उद्देश राजीव योजना अंतर्गत . तर ही राजीव योजना अंतर्गत कोणासाठी आहे? धोकादायकसाठी आहे की झोपडपट्टीसाठी आहे.

**शिवाजी बारकूंड :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो, राजीव आवास योजना झोपडपट्टी शहर मुक्त करण्याची योजना आहे. त्या योजनेच्या सर्व्हेचा काम चालू आहे तो भाग वेगळा त्या योजने अंतर्गत प्रत्येक शहरासाठी पायलेट प्रोजेक्ट करण्यासाठी शासनाने सांगितले होत डी.पी.आर तयार करा. ्त्यासाठी आपल्याकडे ट्राझिस्ट कॅम्पची कुठे ही व्यवस्था नव्हती त्यामुळे आपण हा एक हजार घराचा प्रथम दर्षणी अहवाल हा राज्य शासनाला पाठवला. राज्य शासनाने तो तत्वतः मान्य केला. ट्रान्झीट कॅंम्प चा पायलेट प्रोजेक्ट राजीव आवास योजने अंतर्गत बांधायला परवानगी त्याच्यासाठी डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट करण्यासाठी ही निविदा मागविलेली आहे. यातुन १०० टक्के निधी हा केंद्र शासनाकडुन मिळणार आहे. राजीव आवास योजना ही वेगळी आहे. त्याच्यासाठी हे परमनंट ट्रान्झीट कॅंम्प हे ह्या महापालिकेच्या मालकीचं होणार आहे. त्याचा वापर महापालिका मा. महासभा धोरण ठरवेल त्याप्रमाणे वापर होणार आहे.

**प्रविण पाटील :-**

आता आपण जी मागणी करणार आहोत. झोपडपट्टी पुर्नवर्सन तुम्ही नियोजन केल्याप्रमाणे होणार. तिथे आपण देणार आहोत पण आपण त्याचा उपयोग धोकादायक इमारतीसाठी करणार आहोत का?

**शिवाजी बारकुंड :-**

पाटील साहेब तुम्ही कंन्फ्युजन करु नका.

**प्रविण पाटील :-**

तुम्ही करता तुमचा विषय आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

राजीव आवास योजना झोपडपट्टी शहर मुक्त करायचं आहे. तो सर्व्हे ती योजना वेगळी आहे. त्याचे कामकाज चालू आहे परंतु त्या योजने अंतर्गत पायलेट प्रोजेक्ट प्रत्येक शहरासाठी करायला सांगितला होता. जर तो पायलेट प्रोजेक्ट आपण आपल्या शहरामध्ये ट्रान्झीट कॅंम्प ची व्यवस्था कुठेच नाही. एखादी इमारत कोसळली तात्पुर्ती व्यवस्था करायला कुठेच जागा नाही रस्ता तोडला त्या लोकांना कुठेच पर्यायी जागा नाही.

**प्रविण पाटील :-**

मला सगळ माहित आहे. पण माझा विषय एवढाच आहे की, आपण जो ट्रान्झींट कॅंम्प बांधणार आहोत तो राजीव आवास योजना १०० टक्के अनुदान देतो ते बांधणार आहे. त्याचा उपयोग आपण धोकादायक इमारती मध्ये जे बाधित लोक आहेत त्यांना करु शकतो का?

**शिवाजी बारकुंड :-**

सर्व करु शकतो. महापालिकेने धोरण ठरवायचं आहे.

**प्रविण पाटील :-**

माझा मुद्दा तोच आहे आपण जी मागणी करणार तो त्या योजने अंतर्गत आणि उपयोग त्याचा असा होणार आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

आपण मागणी काय करतो. तुमचं म्हणंण होत की, त्या योजनेला राजीव आवास योजना नाव आहे. ट्रान्झींट कॅंम्पसाठीचा प्रोजेक्ट आहे आणि महापालिका ठरवेल. उद्या धोकादायक इमारती मधली लोक जातील रस्ते तोडलेली तर तिकडची लोक जातील.

**बर्नड डिमेलो :-**

उद्या जर त्सुनामी, वादळ, तुफान काहीही आलं तिथली जर गाव खाली केलं तर तु कुठे जातील. आपतकालीन लोकवस्ती जर आपण हलवली तर कसं होईल.

**प्रविण पाटील :-**

त्याचा उपयोग आपण करु शकतो का?

**शिवाजी बारकुंड :-**

१०० टक्के उपयोग करु शकतो.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

इसके अंदर अंदाजित रक्कम कितनी है? वह परसेंटेंज व्हाईज चाहीए। इसमे स्पष्ट नही किया है वह किजीए।

**शिवाजी बारकुंड :-**

अंदाजित किंमत आपण आपल्याकडे नाही सुमारे ९० ते १०० कोटी अंदाजित त्याच्यासाठी आपण बनवणार आहे. मेन्शन नसणार ना तो डीपीआर बनवणार त्याची किंमत राहणार ती.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

अभी स्पष्ट नही है यह एक बात क्लिअर हो गई है और दुसरी बात वॅब कॅब लिमिटेड है ना। मेरे जानकारी के मुताबीक पीडब्ल्युडी के कामकाज की गुणवत्ता संभालने के लिए एक पर्टीक्युलर ऑथॉरीटी है जो की पीडब्ल्युडी के कामकाज की ऑडीट रिपोर्ट देती है। जो कंपनी अपने कामकाज की गुणवत्ता चेक करती है उसी कंपनी को ठेकेदार यहाँपर इंन्क्लुड करते है तो उसे उसको जो वर्क बेनीफिट लेने का ताकद आ जाए तो ऑडीट रिपोर्ट से ले सकती है।

**शिवाजी बारकुंड :-**

यह देखिए कॉन्ट्रॅक्ट किसने भरना चाहीए उन्होने भरा है उसको आप मना नही कर सकते है।

**बर्नड डिमेलो :-**

वह तो खाली प्लान बनाया है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

जो कंपनी आपके पीडब्ल्यु डी की रिपोर्टींग कर रही है।

**दिपक खांबित :-**

महानगरपालिका कॅन्सल भी कर सकती है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

यह कंपनी आपकी रिपोर्टींग करती है वही आपसे बेनीफिट लेती है तो वह सही रिपोर्टींग कैसे करेगी?

**शरद पाटील :-**

ह्याच्यात तशी तरतुद आहे का? करु शकतो भरु शकतो?

**दिपक खांबित :-**

साहेब वह गुजरात गव्हर्नमेंट की कंपनी है।

**बर्नड डिमेलो :-**

डॉ. साहब, हर महापालिका ने एक यह होना चाहीए। जैसे की त्सुनामी, तुफान, वादळ होता है वह ऑडीट के जैसे का होता है अपने महापालिकेका कुछ तो होना चाहीए। जैसे तुम लोगों को याद आती है धोकादायक इमारत अरे हम लोगो को वो याद रखो। समुंदर मे तुफान आजाए। उत्तन खाली हो जाए तो जाऐंगे कहाँ? महापालिका किधर जगह देगी? वैसे कुछ तो जगह होना चाहीए ना मिरा भाईंदर मे। मी ठरावाचे वाचन करतो. दि. ०७/०७/२०१२ रोजी दै. नवाकाळ, दै. फ्रि प्रेस जनरल मध्ये मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात राजीव आवास योजनेअंतर्गत संक्रमण शिबिराचा पथदर्शी प्रकल्पाचा सविस्तर अहवाल तयार करणे कामी प्रसिध्द केलेल्या निविदेनूसार खालीलप्रमाणे ठेकेदारांनी मुदतीत निविदा सादर केलेल्या आहेत.

| **अ.क्र.** | **कामाचे नाव** | **दर** |
|---|---|---|
| **१** | **२** | **३** |
| **१** | राजीव आवास योजने अंतर्गत संक्रमण शिबिराचा पथदर्शी प्रकल्प तयार करणे.<br>**मे. सुभाष पाटील ॲण्ड असोसिएटस्**<br>मे. वॅप्कॉस लिमिटेड<br>मे. टंडन अर्बन सोल्यूशन प्रा.लि. | <br><br>**०.९४५%अंदाजपत्रकीय रक्कमेवर**<br>१.२५ % अंदाजपत्रकीय रक्कमेवर<br>याप्रकरणी पुर्वी मागविलेल्या निविदांमध्ये सदर ठेकेदाराच्या प्रतिनिधीची लाचलुचपत खात्यामार्फत केस सुरु असल्याने सदर निविदेतील दर उघडण्यात आले नाही असा निर्णय घेण्यात आला आहे. |

वरील तुलनात्मक तक्ता पहाता ठेकेदारांनी सादर केलेली सर्वात कमी दराची निविदा ही वाजवी आहे. तरी **मे. सुभाष पाटील ॲण्ड असोसिएटस्** यांची अंदाजपत्रकीय रक्कमेच्या **०.९४५ % दराची निविदेस** मान्यता देण्यात येत आहे.

**प्रमोद सामंत :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ४२ :-**

राजीव आवास योजनेअंतर्गत संक्रमण शिबीर बांधणे या पथदर्शी प्रकल्पासाठी तांत्रिक सल्लागार नेमणेच्या निविदास मान्यता देणे.

**ठराव क्र. ३८ :-**

दि. ०७/०७/२०१२ रोजी दै. नवाकाळ, दै. फ्रि प्रेस जनरल मध्ये मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात राजीव आवास योजनेअंतर्गत संक्रमण शिबिराचा पथदर्शी प्रकल्पाचा सविस्तर अहवाल तयार करणे कामी प्रसिध्द केलेल्या निविदेनूसार खालीलप्रमाणे ठेकेदारांनी मुदतीत निविदा सादर केलेल्या आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | दर |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | राजीव आवास योजने अंतर्गत संक्रमण शिबिराचा पथदर्शी प्रकल्प तयार करणे.<br>**मे. सुभाष पाटील ॲण्ड असोसिएटस्**<br>मे. वॅप्कॉस लिमिटेड<br>मे. टंडन अर्बन सोल्यूशन प्रा.लि. | <br><br>**०.९४५%अंदाजपत्रकीय रक्कमेवर**<br>१.२५ % अंदाजपत्रकीय रक्कमेवर<br>याप्रकरणी पुर्वी मागविलेल्या निविदांमध्ये सदर ठेकेदाराच्या प्रतिनिधीची लाचलुचपत खात्यामार्फत केस सुरु असल्याने सदर निविदेतील दर उघडण्यात आले नाही असा निर्णय घेण्यात आला आहे. |

वरील तुलनात्मक तक्ता पहाता ठेकेदारांनी सादर केलेली सर्वात कमी दराची निविदा ही वाजवी आहे. तरी **मे. सुभाष पाटील ॲण्ड असोसिएटस्** यांची अंदाजपत्रकीय रक्कमेच्या **०.९४५ % दराची निविदेस** मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४३, मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील स्वच्छतागृहाचे संचलन, देखभाल व दुरुस्ती करणाऱ्या वस्ती पातळीवरील संस्था (सीबीओ) व महानगरपालिकेने नियुक्त केलेले ठेकेदार यांना ठराविक रक्कम अदा करणेस मान्यता देणे.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, आपल्या परवानगीने बोलतो एक ते स्वच्छता गृह संकुलन आहे हा विषय आपण एमएमआरडीए तर्फे सर्व बांधुन दिलेले आहेत आणि त्या संस्थांना चालवायला दिले त्यांनी त्यांचा खर्च करायचा आणि त्यांचा सगळं वापरुन काय त्याचे आहे ते त्यांनी करायचं आहे. दुसरा विषय की हा ठराव मा. महासभेमध्ये झालेला आहे. मा. महासभेमध्ये झालेल्या ठरावाला परत स्टॅंडींग मध्ये आणून त्याची मंजुरी घेऊ शकतो का?

**दिपक खांबित :-**

साहेब, मा. महासभेपुढे शिफारस करावी लागेल.

**शरद पाटील :-**

हा विषय आणलाच का? ठराव मांडण्यापेक्षा हा विषय फेटाळून टाका विषय आणायलाच नाही पाहिजे हा विषय आणल्याचा ठराव कसा होईल.

**बर्नड डिमेलो :-**

मा. महासभेपुढे घ्या.

**शरद पाटील :-**

नाही ते त्यांच काम आहे तुम्ही घेऊ शकत नाही.

**दिपक खांबित :-**

ह्याच्यामध्ये कसं आहे की, ह्याच्यामध्ये खर्च जो आहे ना हा आपला खर्च स्टँडींग कमिटीच्या आतमध्ये आहे म्हणून आम्ही विषय आणला.

**रोहिदास पाटील :-**

तुमची जी भाषा आहे ना ती एकदा दोनदा परत वाचा. एकतर तुम्ही अर्थ संकल्पात तरतुद करा असं सांगता परत तुम्ही आमच्या सभेमध्ये आणता अर्थ संकल्पामध्ये वाकोडे साहेबांनी ३० कोटीची तरतुद केली आम्ही कोणी विरोधही नाही केला. शंका विचारल्या समजुन घेतलं हे तुम्ही ५० लाख रुपये साठी असा ठराव आणायची गरजच काय होती.

**शरद पाटील :-**

हा विषयच फेटाळण्यात येतो त्यांनी हा विषय मा. महासभेला पाठवा ना.

**बर्नड डिमेलो :-**

फेटाळण्यापेक्षा मा. महासभेपुढे घ्या आता महासभेपुढे पाठवलं म्हणजे फेटाळणं झालं ना.

**शरद पाटील :-**

नाही. नाही. मा. महासभेपुढे आपण शिफारस करायची गरज नाही. मा. महासभा सुप्रिम आहे मा. महासभेमध्ये गेलेला विषय ह्या मिटींगमध्ये कशाला पाहिजे.

**बर्नड डिमेलो :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या निर्मल एम.एम.आर. योजनेच्या अनुदानातून १४६ ठिकाणी स्वच्छतागृह बांधण्यात आलेली असून सदर स्वच्छतागृहाच्या बांधकामावर महानगरपालिकेने काहीही खर्च केलेला नाही. सदर स्वच्छता गृह संचलन, देखभाल व दुरूस्ती करीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या योजनेनूसार स्थानिक पातळी वरील संस्थाना करारनामे करून देण्यात आलेली आहेत. तथापी ज्या संस्थाना सदर स्वच्छतागृह चालविण्यासाठी देण्यात आलेली आहेत त्यापैकी ब-याच संस्थाना साफसफाई, वीज वापराचे तसेच पाण्याचे बील देखिल भरण्यास जमत नाही. प्रत्यक्षात स्वच्छतागृह वापरणा-या कडून सदर संस्थाना मासिक ठरविलेली रक्कम देण्यात येत नाही. त्यामुळे ब-याच स्वच्छतागृहांची दुरावस्था झालेली आहे. विद्युत मीटर काढण्यात आलेली असून बरीच स्वच्छतागृहे बंद देखिल झाली आहेत. दरम्यानच्या काळात काही स्वच्छतागृहे संचलन व देखभाल दुरूस्ती करणा-या संस्थाचे करारनामे रद्द करून महानगरपालिकेमार्फत ठेकेदार नेमून त्यांना कामे देण्यात आली. तथापी त्यांच्या मार्फत देखिल सदर स्वच्छतागृहाची साफसफाई व्यवस्थितरीत्या होत नसल्याने सदस्य, लोकप्रमिनिधी यांच्या तक्रारी या कार्यालयाकडे येत आहेत. महानगरपालिकेच्या आस्थापनेवर देखिल कर्मचारी वर्ग अपूरा असल्याने सदर स्वच्छतागृहे यांची दैनंदिन साफसफाई करता येणार नसून देखभाल दुरूस्ती वरील खर्च मोठ्या प्रमाणावर येईल.

ठाणे महानगरपालिकेत देखिल याच प्रकारे स्वच्छतेबाबत तक्रारी असल्याने व संस्थाना साफसफाई, वीज देयक, पाणी देयक यांचा खर्च परवडत नसल्याने अशा संस्थाना रू.१५०/- प्रति सीट प्रमाणे अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे सदर संस्थाना विज देयक, पाणी देयक अदा करून साफसफाई करण्यास मदत होणार आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बांधण्यात आलेल्या स्वचछतागृहांचा सुरक्षा कालावधी संपलेला असून यापुढे देखभाल व दुरूस्ती देखिल संस्थाना स्वखर्चाने करावा लागणार आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थितीत १४६ स्वच्छतागृहे असून एकूण ३००० सीट पैकी औद्योगिक वसाहती मधील स्वच्छतागृहे वगळून इतर २७७० सीट ना रू. १५०/- प्रति सीट प्रमाणे अनुदान दिल्यास मासिक रू. ४,१५,५००/- व वार्षिक रू. ४९,८६,०००/- एवढा महानगरपालिकेस खर्च येईल व संबधित संस्थाना साफसफाई करून वीज देयक, पाणी देयक प्रदानास मदत होईल.

महानगरपालिकेमार्फत अशा प्रकारे अनुदान देण्यात येणा-या संस्था सोबत करारनामा करून अटीशर्ती विहीत करण्यात येतील. सन२०१३-१४ या वर्षाच्या अर्थसंकल्पात सदर कामाकरीता तरतुद करण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत असून धोरण असल्याने अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे शिफारस करण्यात येत आहे.

**प्रमोद सामंत :-**

माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

नाही नाही आम्ही ह्याला शिफारस करु शकत नाही हा विषय इथून फेटाळावा आणि आयुक्तांनी त्यांच्या हिशोबाने करावे ना. मा. सभापती साहेब हे योग्य नाही आहे. शिफारस करायची कारण नाही आहे. हा मा. महासभेमध्ये झालेला विषय आहे. मा. महासभेमध्येच झाला पाहिजे ह्याच्यामुळे शिफारस करायची गरज नाही.

**मा. सभापती :-**

आता हा विषय आलेला आहे ना...

**शरद पाटील :-**

फेटाळून टाका ना. विषयच फेटाळा महासभेमध्ये जाईल ना ते पाठवतील ना.

**प्रविण पाटील :-**

मा. सभापती साहेब, विषय फेटाळून टाका ना एका विषयाने काय फरक पडतो.

**शरद पाटील :-**

फेटाळून शिफारस नाही हा विषय तुम्ही फेटाळूनच टाका हा विषय फेटाळण्यात येतो. मा. महासभेला आम्ही शिफारस करु शकत नाही. हा मा. महासभेचाच विषय आहे. महासभेचा विषय आणायचा कारणच नव्हत. याला महासभेने दिलेली मंजूरी आहे. आणि हा विषय तुम्ही स्थायी समितीमध्ये ...............

**बर्नड डिमेलो :-**

आपण जर मा. महासभेपुढे पाठवतो. ह्याच्यामध्ये आणि फेटाळण्यामध्ये काय आहे.

**शरद पाटील :-**

हा विषय आपल्याला घ्यायचाच नाही. अस कस होईल. हा प्रशासनाचा विषय आहे.

**हेलन गोविंद :-**

ते मा. महासभेमध्ये विषय पाठवतात ना.

**शरद पाटील :-**

प्रशासन पाठवेल ना हा विषय. आपण कशाला पाठवायला पाहिजे.

**बर्नड डिमेलो :-**

आपल्याकडे आला. भले चुकीने असो किंवा कसा ही असो. आपल्याकडे आला आपण जे करु शकतो ते करु शकत नाही.

**शरद पाटील :-**

हा विषय फेटाळून लावा.

**बर्नड डिमेलो :-**

शिफारस केली आहे.

**शरद पाटील :-**

शिफारस करण्यात अर्थ नाही.

**बर्नड डिमेलो :-**

शिफारस आम्ही केलेली आहे. तुम्ही काय करताय.

**शरद पाटील :-**

आम्ही फेटाळतो. तुम्ही करा शिफारस.

**बर्नड डिमेलो :-**

मी आता वाचले आहे ना शिफारस करायच म्हणून.

**शरद पाटील :-**

वाचा ना आम्ही त्याच्यावर ठराव मांडतो.

**प्रविण पाटील :-**

मा. सभापती साहेब, हा विषय बघा कसा आहे. दोन विषय झाले. हा विषय मा. महासभेपुढे आला होता. मा. महासभेमध्ये विषय आल्यानंतर परत इथे आला. संबंधित अधिकाऱ्यांनी हा विषय इथे आणण्याचा उद्देश काय आहे? आणि दुसरी गोष्ट म्हणजे आम्ही हा विषय मा. महासभेमध्ये मंजुर झालेला असताना हा इथे विषय कशाला?

**बर्नड डिमेलो :-**

दादा, मी काय बोलतो की, हा विषय आपण मा. महासभेपुढे पाठवतो.

**प्रविण पाटील :-**

हा विषय मा. महासभेला पाठवला होता.

**शरद पाटील :-**

बर्नड साहेब, हा विषय मा. महासभेपुढे झालेला विषय आहे. आणि मा. महासभेला तुम्ही इथे चॅलेंज करु शकता का?

**बर्नड डिमेलो :-**

चॅलेंज कुठे करता?

**शरद पाटील :-**

चॅलेंज झाल ना. इथे आणला विषय म्हणजे.

**दिपक खांबित :-**

साहेब, मा. महासभेमध्ये हा विषय कुठे झाला. मा. महासभेमध्ये कुठला विषय झाला की, एम.एम.आर.डी.ए. च्या निर्मल अभियान या फंडमधून आपल्या महानगरपालिका क्षेत्रामध्ये शौचालय बांधायची. हा विषय झाला आहे. आता विषय हा कशा करिता आला की, एम.एम.आर.डी.ए. च्या स्किमनुसार ती शौचालय स्थानिक पातळीवर म्हणजे स्किमनुसार सी.बी.यू. ला चालवायला द्यायची आहे. आपण त्या सर्व सी.बी.ओ. ला चालवायला दिलेल्या आहेत. परंतु लोक पैसे देत नाही. किंवा ते मेन्टेन होत नाही. म्हणून ठाणे महानगरपालिकेने काय केल की, त्या प्रत्येक शौचालयाला १५० रु. पर सिट अनुदान द्यायचे म्हणजे त्याला मदत होईल. लाईट बिल भरायला. किंवा पाण्याच बिल भरायला, साफसफाई, या संस्थाना त्या संस्था ज्या तिथे राहतात त्यांना मदत होईल.

**शरद पाटील :-**

कशाला त्या संस्थाना द्यायचे. संस्था पैसे कमवतात तिथे.

**प्रविण पाटील :-**

अनुदान कोण देईल? महापालिका देईल की, ..........................

**दिपक खांबित :-**

आपल्याकडे अशी मागणी आहे की, महानगरपालिकेने स्वतः शौचालय साफ करावे माणसे वैगेरे लावून. जर आपण साफ करायला गेलो तर तो भरमसाठ खर्च होता. त्यामुळे ठाणे महानगरपालिकेने असा निर्णय घेतला की ज्या संस्था आहेत त्यांना महानगरपालिकेने थोडी मदत करायची पर सिट १५० रु. म्हणजे १० सिटच तुमच शौचालय असेल. तर १५० च्या ह्याने १५०० रु. त्याला आपण महिन्याला द्यायचे. म्हणजे त्याला मदत होईल. त्याच्या माणसाला पगार द्यायला, लाईट बिल भरायला. तर त्याकरिता आम्ही तो खर्च काढला की, आपण पण ठाण्यासारख केले तर आपले शौचालय राहतील आणि आपल्याला महानगरपालिकेचा स्टाफ नेमायला लागणार नाही. त्याकरिता हा विषय झाला की, जर आपल्या इथुन दिला आपल्याकडे १४६ शौचालय आहेत. आणि त्याप्रमाणे प्रत्येक सिट १५० रु. प्रमाणे दिले. तुम्ही मुर्ध्याला जा, राईला जा, मनोरीला जा सगळे शौचालय बंद पडले आहेत. कारण लोक पैसेच देत नाही.

**संदिप पाटील :-**

खांबित साहेब, शौचालयच लाईट बिल मी स्वतः भरलेले आहे. पाण्याचे नळ कनेक्शन कापलेले आहे. साफसफाईसाठी आम्ही माणसे नेमलेली आहेत. तुम्ही जे ठेकेदार नेमले आहेत ते ठेकेदार काहीच काम करत नाही.

**दिपक खांबित :-**

त्यांचा खर्च आहे ना. तो स्टँडींग कमिटी चालू आहे. म्हणून खर्चाला मंजूरी आपण घेऊया. म्हणून आम्ही हा विषय आणला. पण आता विषय असा झाला की, आधी ह्याला महासभेने मंजूरी दिली तर हा निर्णय महासभेचा आहे.

**अनिता पाटील :-**

लाईटच मिटर लागल त्याला बिल खूप येते. आणि बिल पण आम्हीच भरलेले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

त्या चालवणा-याचा ठेका तुम्ही आणखिन कोणाला दिलेला आहे.

**दिपक खांबित :-**

कोणालाच नाही. मी त्यांना परत सांगतो. सी.बी.ओ. काही ठिकाणी चालवत नाही. म्हणून आपण प्रायव्हेट ठेकेदार नेमले. आणि ह्यातुन ही आपण प्रयोग करुन बघितला. ते तर बोलतात तुम्ही चालवा. पण त्यांच्या तिकडची लोक पैसेच देत नाही.

**संदिप पाटील :-**

खांबित साहेब, पैसे लोक देत नाही ही चूकीची गोष्ट आहे. लोक काय बोलतात की, तुम्ही साफसफाई करा. लाईटच बिल भरा. तुम्हाला ६० काय ८० रु. देतो अशी लोक बोलतात. लोक पैसे देत नाही अस बोलु नका.

**प्रविण पाटील :-**

तुम्ही एक गोष्ट क्लिअर करा. मागच्या वेळेला काकांनी सांगितल्याप्रमाणे तुम्ही काहीतरी ५० की ६० जणांचा ठेका एकाला दिला होता. तो करतो का आता? किंवा आता त्याची काय परिस्थिती आहे.

**दिपक खांबित :-**

तो करतो. पण त्याला ते हॅन्डल होत नाही.

(सभागृहात गोंधळ)

**शरद पाटील :-**

अहो साहेब, शौचालय बांधण्यासाठी स्थानिक संस्था ज्या आहेत ना. ते किती किती पैसे खर्च करतात आम्हाला माहित आहे ना. त्याचा सगळा रिपोर्ट आमच्याकडे आहे आणि त्याला कसल महाग पडत लाईट बिल आणि हे.

**संदिप पाटील :-**

लाईट बिल आम्ही स्वतः भरलेले आहेत.

**हेलन गोविंद :-**

लाईट बिल आम्ही स्वतः भरलेले आहेत.

**प्रविण पाटील :-**

शरद साहेब, त्यांना अनुदान मिळत असते. एक सिट मागे १५० रु. ते सी.बी.ओ. ला देत असेल तर. तर तिथे स्वच्छता दिसेल. तिथे काय परिस्थिती आहे आम्हाला माहित आहे. आमच्याकडे झोपडपट्टया आहेत. तिथे अजून संडास साफ होत नाही. कोण करायला बघत नाही. तो पटेल कोण आहे त्याला. दिलेले आहे ना तो तर लक्षच देत नाही. त्यांनी पैसे घेतले की नाही त्याची चौकशी करा. कारण, आजपर्यंत आम्ही महानगरपालिकेच्या माणसाकडून साफसफाई करुन घेतो. तुम्ही स्थानिक संस्थांना पहिल दिलेल आहे. ते देत असाल तर आम्ही तयार आहोत.

(सभागृहात गोंधळ)

**बर्नड डिमेलो :-**

आम्ही मा. महासभेत नेण्यास शिफारस करीत आहोत. तुम्हाला फेटाळायच असेल तर फेटाळा.

**प्रविण पाटील :-**

अनुदान देत असेल तर चांगली गोष्ट आहे.

**हेलन गोविंद :-**

अनुदान देतात ना ते लोक.

**प्रविण पाटील :-**

मी तर सांगतो हा विषय इथेच मंजूर करा. इथे होत असेल तर कारण आमच्यासाठी हा विषय महत्वाचा आहे. मिरादेवी मॅडमने सांगाव त्यांच्या तिकडच शौचालय साफ आहेत अस.

**राजेश वेतोसकर :-**

साहेब, ह्याच्यामध्ये अडचण काय आहे? मा. महासभेला पाठवायला लागेल की इथे मंजूर करता येईल.

**प्रविण पाटील :-**

मा. सभापती साहेब, मी तर सांगतो हा विषय इथेच मंजूर करा. आणि त्याला आमची सुचना घ्या कारण, तिथे संडास साफ होत नाही. आम्हाला माहित आहे.

**मा. सभापती :-**

मी सगळयांना विनंती करतो की, एक एकाने बोला.

**संदिप पाटील :-**

साहेब, जर तुम्ही स्थानिक संस्थेला देत असाल तर हा विषय तुम्ही इथेच मंजूर करा. नसेल तर फेटाळून लावा.

**प्रविण पाटील :-**

फेटाळून नका लावू. हा विषय ह्या सुचनेसह इथे मंजूर होत असेल तर करुन टाका.

**दिपक खांबित :-**

करुन टाकायला काय नाही. पण कस आहे की, आपण अनुदान देतो ना. तर हा धोरणात्मक विषय होऊ शकेल.

**प्रविण पाटील :-**

अनुदानाच सांगतो ना. तुम्ही अनुदान मंजूर करा सांगितले ना.

**दिपक खांबित :-**

नाही. शिफारस करायला सांगितले.

**प्रविण पाटील :-**

इथे तरतुद आहे तर करु शकतो ना.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

साहब, जो शौचालय की गंदगी है ना यह विषय पिछले, जबसे बनाया तबसे चल रहा है। अभि आप अनुदान दे रहे है साफ करने के लिए। पर आप क्या गॅरेन्टी लेते है क्या, की खर्चा देने के बाद भी यह सफाई रहेगी। नही रहनेवाली है। अनुदान बेकार जाएगा। यह सफाई नही होनेवाली। जो उद्देश उद्देश के साथ पैसा दे रहे है, वह फिर भी काम नही आयेगा। एक साल बाद हम फिर बैठेंगे और कहेंगे की सफाई नही हो रही है।

**हेलन गोविंद :-**

डॉ. साहब, हमारे वॉर्ड मे इसलीए हम बोल रहे है, वरना हमको बोलनेकी जरुरत नही थी।

**बर्नड डिमेलो :-**

मा. सभापती साहेब, ठराव वाचून झाला आहे. आपण मा. महासभेला शिफारस केलेली आहे. कशाला चर्चा पाहिजे. त्यांना विरोध करायचा तर विरोध करतील. तुम्हांला ठराव मांडायचा असेल तर ठराव मांडा.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, प्रत्येक वेळेला हे शब्द व्यवस्थित नसतात. लक्षात ठेवा तुम्ही, ही भाषा बरोबर नाही.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ४३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील स्वच्छतागृहाचे संचलन, देखभाल व दुरुस्ती करणाऱ्या वस्ती पातळीवरील संस्था (सीबीओ) व महानगरपालिकेने नियुक्त केलेले ठेकेदार यांना ठराविक रक्कम अदा करणेस मान्यता देणे.

**ठराव क्र. ३९ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या निर्मल एम.एम.आर. योजनेच्या अनुदानातून १४६ ठिकाणी स्वच्छतागृह बांधण्यात आलेली असून सदर स्वच्छतागृहाच्या बांधकामावर महानगरपालिकेने काहीही खर्च केलेला नाही. सदर स्वच्छता गृह संचलन, देखभाल व दुरूस्ती करीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या योजनेनूसार स्थानिक पातळी वरील संस्थाना करारनामे करून देण्यात आलेली आहेत. तथापी ज्या संस्थाना सदर स्वच्छतागृह चालविण्यासाठी देण्यात आलेली आहेत त्यापैकी बऱ्याच संस्थाना साफसफाई, वीज वापराचे तसेच पाण्याचे बील देखिल भरण्यास जमत नाही. प्रत्यक्षात स्वच्छतागृह वापरणाऱ्या कडून सदर संस्थाना मासिक ठरविलेली रक्कम देण्यात येत नाही. त्यामुळे बऱ्याच स्वच्छतागृहांची दुरावस्था झालेली आहे. विद्युत मीटर काढण्यात आलेली असून बरीच स्वच्छतागृहे बंद देखिल झाली आहेत. दरम्यानच्या काळात काही स्वच्छतागृहे संचलन व देखभाल दुरूस्ती करणाऱ्या संस्थाचे करारनामे रद्द करून महानगरपालिकेमार्फत ठेकेदार नेमून त्यांना कामे देण्यात आली. तथापी त्यांच्या मार्फत देखिल सदर स्वच्छतागृहाची साफसफाई व्यवस्थितरीत्या होत नसल्याने सदस्य, लोकप्रमिनिधी यांच्या तक्रारी या कार्यालयाकडे येत आहेत. महानगरपालिकेच्या आस्थापनेवर देखिल कर्मचारी वर्ग अपूरा असल्याने सदर स्वच्छतागृहे यांची दैनंदिन साफसफाई करता येणार नसून देखभाल दुरूस्ती वरील खर्च मोठ्या प्रमाणावर येईल.

ठाणे महानगरपालिकेत देखिल याच प्रकारे स्वच्छतेबाबत तक्रारी असल्याने व संस्थाना साफसफाई, वीज देयक, पाणी देयक यांचा खर्च परवडत नसल्याने अशा संस्थाना रू.१५०/- प्रति सीट प्रमाणे अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे सदर संस्थाना विज देयक, पाणी देयक अदा करून साफसफाई करण्यास मदत होणार आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बांधण्यात आलेल्या स्वचछतागृहांचा सुरक्षा कालावधी संपलेला असून यापुढे देखभाल व दुरूस्ती देखिल संस्थाना स्वखर्चाने करावा लागणार आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थितीत १४६ स्वच्छतागृहे असून एकूण ३००० सीट पैकी औद्योगिक वसाहती मधील स्वच्छतागृहे वगळून इतर २७७० सीट ना रू. १५०/- प्रति सीट प्रमाणे अनुदान दिल्यास मासिक रू. ४,१५,५००/- व वार्षिक रू. ४९,८६,०००/- एवढा महानगरपालिकेस खर्च येईल व संबधित संस्थाना साफसफाई करून वीज देयक, पाणी देयक प्रदानास मदत होईल.

महानगरपालिकेमार्फत अशा प्रकारे अनुदान देण्यात येणाऱ्या संस्था सोबत करारनामा करून अटीशर्ती विहीत करण्यात येतील. सन२०१३-१४ या वर्षाच्या अर्थसंकल्पात सदर कामाकरीता तरतुद करण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत असून धोरण असल्याने अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे शिफारस करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४४, निविदेस मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**बर्नड डिमेलो :-**

| अ.क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| **१** | **भाईंदर (प.) पोलिस स्टेशन ते एम.टी.एन.एल. कार्यालयापर्यंत गटार बांधून फुटपाथ तयार करणे.** | **रू.१,११,८०,४००/-** |

| | | |
|---|---|---|
| | **१. मे. गजानन कंन्स्ट्रक्शन**<br>२. मे. ललित इंटरप्रायझेस<br>३. मे. राठोड असोसिएटस् | **अंदाजपत्रकीय दराने**<br>८.०० % जास्त दराने<br>६.५१ % जास्त दराने |

वरील निविदातील **मे. गजानन कंन्स्ट्रक्शन** यांची **अंदाजपत्रकीय दराची** निविदा वाजवी असून सदर निविदेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

**राजेश वेतोसकर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ४४ :-**

निविदेस मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ४० :-**

| **अ.क्र.** | **कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव** | **अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर** |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| **१** | **भाईंदर (प.) पोलिस स्टेशन ते एम.टी.एन.एल. कार्यालयापर्यंत गटार बांधून फुटपाथ तयार करणे.**<br>**१. मे. गजानन कंन्स्ट्रक्शन**<br>२. मे. ललित इंटरप्रायझेस<br>३. मे. राठोड असोसिएटस् | **रू.१,११,८०,४००/-**<br><br>**अंदाजपत्रकीय दराने**<br>८.०० % जास्त दराने<br>६.५१ % जास्त दराने |

वरील निविदातील **मे. गजानन कंन्स्ट्रक्शन** यांची **अंदाजपत्रकीय दराची** निविदा वाजवी असून सदर निविदेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. राजेश वेतोसकर**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४५, मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या कामांचे अवलोकन करणे (सार्व. बांधकाम विभाग)

**शरद पाटील :-**

साहेब, तुमच्या परवानगीने बोलतो, काल हे लोक बोलत होते. आता कुठचेही अवलोकन असेल तर आम्हाला बोलायला द्यायला पाहिजे, आम्ही बोलणार.

**मा. सभापती :-**

अवलोकन मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ४५ :-**

मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या कामांचे अवलोकन करणे (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ४१ :-**

| **अ.क्र** | **कामाचे नांव** | **अंदाजित खर्च** | **ठेकेदाराचे नांव / कामाचा दर** | **मंजूर दर** |
|---|---|---|---|---|
| १ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. ४६ मधील जनता नगर हायवे टॉवर समोरील सी.सी.गटार बांधून बंदिस्त करणे. (नगरसेवक निधी) | रु. ९,९९,८५०/- | मे. मुस्कान इंटरप्रायझेस | ०.५% कमी दराने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | बी.एस.यु.पी. योजना अंतर्गत घोडबंदर येथे बांधण्यात आलेल्या संक्रमण शिबिरासाठी सी. सी. रस्ता तयार करणे. | रु. ५,७७,७९९/- | मे. राठोड ब्रदर्स | १५.०१ % कमी दराने |
| ३ | मिरारोड (पूर्व) सोनाली रस्त्यावरील गीता व्हिव इमारत ते श्री. हिना ॲव्हेन्यू इमारतीपर्यंत सी.सी.गटर बांधून स्लॅब टाकणे. | रु. ६,८९,२००/- | मे. राठोड ब्रदर्स | १५.०१ % कमी दराने |
| ४ | मिरारोड (पूर्व) एव्हरशाईन नगर रस्त्याच्या गटारावर स्लॅब टाकणे. | रु. ५,१७,०२०/- | मे. मुस्कान इंटरप्रायझेस | २.००% कमी दरान |
| ५ | भाईंदर (पूर्व) श्रीकृष्ण कॉम्प्लेक्स येथिल विमल डेरी येथे कल्वर्ट बांधणे. (व्दितीय मुदतवाढ) | रु. ६,३६,६००/- | मे. मुस्कान इंटरप्रायझेस | ६.००% कमी दराने |
| ६ | मिरारोड (पूर्व) भारतरत्न इंदिरागांधी हॉस्पीटल इमारतीमध्ये वाढीव जनरेटर पुरवठा करुन बसविणे. | रु. १३,२०,५५२/- | मे. आदित्य इलेक्ट्रीकल्स | २०.००% जास्त दराने |
| ७ | भाईंदर (पूर्व) बजरंग बली हॉटेल गल्लीतील गांधी इस्टेट व बालाजी इस्टेट मधील गटारे व रस्ते बनविणे. | रु. ७,८०,९००/- | मे. राठोड ब्रदर्स | १३.७१% कमी दराने |
| ८ | मुख्य कार्यालय येथील स्थायी समिती सभापती यांचे दालनाचे नुतनीकरण करणे. | रु. ५,२२,५००/- | मे. राठोड असोसिएटस् | अंदाजपत्रकीय दराने |
| ९ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. ५ येथिल खाऊ गल्ली (बी.पी.रोड) ते पाटील ब्रदर्स इंडस्ट्रीयल इस्टेट व शांती नगर इस्टेट या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रु. ५,५३,०८०/- | मे. एन.एस. इंटरप्रायझेस | अंदाजपत्रकीय दराने |
| १० | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २५ मध्ये २०१२-१३ चा नगरसेवक निधीतून चौक गावामध्ये विकास कामे करणे. (गटारे व सी.सी.रस्ते) (नगरसेवक निधी) | रु. ९,९९,५००/- | मे. श्रीगणेश इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकीय दराने |
| ११ | भाईंदर (पूर्व) कल्याण कॉटेज व काशिनाथ स्मृती गल्लीतील रस्ता व गटर बनविणे. | रु. १०,९४,०००/- | मे. ललित इंटरप्रायजेस | ५.१ % कमी दराने |
| १२ | भाईंदर (पूर्व) चंदु टॉवर ते शुभ लक्ष्मी इमारतीपर्यंत रस्ता बनविणे. | रु. ८,२७,२५०/- | मे. ललित इंटरप्रायजेस | ५.१ % कमी दराने |
| १३ | भाईंदर (प.) नगरभवन येथील उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाच्या कार्यालयाचे नुतनीकरण करणे. | रु. ५,५५,०००/- | मे. राठोड असोसिएटस् | अंदाजपत्रकीय दराने |
| १४ | मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर १ मधील बी-४७ ते बी-४४ पर्यंत सी.सी.गटर बांधून स्लॅब टाकणे. | रु. ८,८१,६५०/- | मे. मुस्कान इंटरप्रायझेस | **१२.२**% कमी दराने |
| १५ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील गटारे/ नाल्यावर फायबर झाकणे बसविणे. | रू. २५,००,०००/- | मे. समकीत इंजिनिअर्स | |

| | | | | **SAMKIT ENGINEERS** |
|---|---|---|---|---|
| **SR. NO.** | **DISCRIPTION** | **SIZE** | **PER** | **RATE QUOTE BY CONTRACTOR** |
| 1 | ITEM NO.1<br>Providing and Fixing Fiber Covers with angel frame of various sizes for pedestrian, footpath having load bearing capacity 1.50 to 2.5 tons. Safety factor 1 to 3, having integrated metal frame design to seal and load equally with strong structure, inter locking arrangement colour code | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | identification etc. required specification as instructed by Engineer In charge | | | |
| | **Fiber cover with frame** | 0.60M x 0.60 M<br>0.60M x 0.75 M<br>0.75M x0.75 M<br>0.75M x 0.90 M<br>0.90M x 0.90M | NO<br>NO<br>NO<br>NO<br>NO | **4131.00**<br>**4203.00**<br>**4410.00**<br>**5742.00**<br>**6021.00** |
| | **Fiber cover without frame** | 0.60M x 0.60 M<br>0.60M x 0.75 M<br>0.75M x 0.75 M<br>0.75M x 0.90 M<br>0.90M x 0.90M | NO<br>NO<br>NO<br>NO<br>NO | **3051.00**<br>**3087.00**<br>**3294.00**<br>**4626.00**<br>**4941.00** |
| १६ | मिरा-भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारतीमध्ये लिफ्ट् करीता विकएंड पॅकेज पुरवठा करुन बसविणे, कंट्रोल पॅनल बोर्ड व स्वीच बोर्ड बदलणे, केबिन आणि इतर पार्ट तसेच चेकर्ड प्लेट पुरवठा करुन बसविणे. (चतुर्थ मुदतवाढ) | रु. १३,०४,८८७/- | | |

| | | | **Otis Elevator Co. India Ltd** | |
|---|---|---|---|---|
| **Item. No.** | **Description** | **Qty** | **Rate** | **Total** |
| 1 | Fixing of weekend Packages | 2 | **79,951/-** | **1,59,902/-** |
| 2 | weekend Package- 5 Stops | 2 | **1,86,553 /-** | **3,73,106/-** |
| 3 | Supplying & Fixing of S.S. Hairline Finish cabin, Fan,Fan Grill,Car Sill,Car Door,Spot Light,False Ceiling. | 2 | **3,63,954/-** | **7,27,908/-** |
| 4 | Supplying And Fixing Of Chequered Plates | 2 | **21,986/-** | **43,972/-** |
| | Total | | | 1304888/- |

वरील मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार अवलोकन करण्यात आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४६, मा. स्थायी समिती सदस्यांकरिता अभ्यास दौरा आयोजित करणेबाबत.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. सभापती साहब, मुझे मालुम है यह प्रस्ताव पास होगा। लेकीन फिर भी जनप्रतिनिधीयोका दौरा करने का खर्चा करनेके मै खिलाफ हूँ। मेरा विरोध दर्ज किया जाए। इस तरहसे घुमने फिरने को मेरा विरोध रहेगा। मेरा विरोध ऑन रेकॉर्ड लिया जाए।

**बर्नड डिमेलो :-**

मा. सभापती साहेब, अभ्यास दौरा हा शहराचा पैसा आहे. हा प्रत्येक महापालिकेमध्ये आहे. मग ते महाराष्ट्र शासन असो की...........

**रोहिदास पाटील :-**

राज्यामध्ये दुष्काळी परिस्थिती आहे. त्या परिस्थितीचा अंदाज घेता, आमची भारतीय जनता पार्टीचा या दौऱ्यामध्ये शामिल व्हायला तयार नाही. आमचा काय विरोध नोंदवायचा तो नोंदवा. कसे लिहायचे तसे लिहा. जसे रेकॉर्डींग करायचे तसे करा.

**बर्नड डिमेलो :-**

अभ्यास दौरा ह्या महापालिकेचे नगरसेवक नविन आहेत, जुने आहेत, वयस्कर आहेत आणि अनेकदा निवडून आलेले नगरसेवक आहेत. त्यांना ज्ञान असेल शहराचा, अन्य शहराचा, भारतातल्या काना कोपऱ्यातला.

जरी अनुभव असला तरी पण नवीन, नवखे नगरसेवक आहेत. त्यांना अन्य शहरामध्ये, अन्य महापालिका काय करतात, कोणत्या प्रकारची गटारे बांधली जातात. शहरामध्ये काय-काय झाल पाहिजे, काय केल पाहिजे. तर मला वाटते की, आपण अन्य शहरामध्ये महापालिकेचा अभ्यास दौरा करुन आपण आपल्या शहरामध्ये अजून योजना चांगल्या कशाप्रकारे येतील. जस निकृष्ट बांधकाम आहे, डिवाईडर आहेत, वृक्ष प्राधिकरण, याचा तर मला वाटते महापालिकेमार्फत नगरसेवकांनी दौरा केला तर त्यांनी जो अभ्यास केलेला असेल तो सर्वांसाठी फार उपयोगी ठरेल. म्हणून हे दौरे नुसते पैशाची उधळपट्टी करण्यासाठी नव्हे तर अभ्यास करुन आपल्या शहराचा विकास कसा करता येईल. मगाशी आम्ही गेलो होतो. आपल्याला चारही बाजूने समुद्र सापडला. समुद्राच्यामध्ये आपल भाईंदर शहर वसलेल आहे, त्या शहराला समुद्र किनारा असून आजपर्यंत आपल्याला मत्सालय नाही. अशा प्रकारे फक्त बिल्डर लोकांना सपोर्ट देण्याकरीता शहराचा बट्टया बोळ करुन टाकला आहे. तो कसा सुटसुटीत होईल शहराला आणखी कशी सुंदरता आणता येईल. मी शांघाय करणाची भाषा जरी नाही करत पण, छोट्या शहराचा महाराष्ट्रामध्ये, भारतामध्ये आपली शान झाली पाहिजे आणि आपल्या महापालिकेच नाव झाल पाहिजे. म्हणून बाहेर जाऊन अन्य शहराच्या महापालिकेचा अभ्यास करुन सदरचा बाहेरचा जो अनुभव येईल तो आपल्या मिरा भाईंदरमध्ये कसा विकास करता येईल त्याच्यावर जाणण्यासाठी मला तरी वाटते सर्वांनी याव. त्याचा अभ्यास करुन आपआपल्या परीने ज्या काही सुचना आणि जे काही अनुभव असतील ते आपल्या शहरामध्ये आणाव आणि आपल्या शहराचा विकास करावा. त्यासाठी अभ्यास दौरा करणं आज जरी दुष्काळाचा परिणाम असला, शॉर्टकट मध्ये आपल्याला काय करता येईल. त्यावर उरलेला निधी जर आपल्या अभ्यास दौऱ्याचा असेल तर आपण तो दुष्काळ भागाला आपण पाठवावा. स्थायी समिती मार्फत असा मी ठराव मांडत आहे की, हा दौरा रद्द करु नये. अभ्यास करावा आणि उर्वरीत रक्कम दुष्काळीभागामध्ये पाठवावी असा मी ठराव मांडत आहे. आणि हा अभ्यास दौरा काढण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**संदीप पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ४६ :-**

मा. स्थायी समिती सदस्यांकरिता अभ्यास दौरा आयोजित करणेबाबत.

**ठराव क्र. ४२ :-**

मिरा भाईंदर महानरगपालिका क्षेत्र मुंबई महानगरालगत असुन शहराची लोकसंख्या वेगाने वाढत असुन विकास झपाट्याने होत आहे. शहरात मुलभूत नागरी सोयी सुविधा पुरविणे, शहराचा सर्वांगीण विकास करणे, शहराच्या हिताच्या दृष्टीने शहरात नवनविन योजना, प्रकल्प राबविणे याबाबत इतर शहर व देशात जावून तेथील विकासाबाबत व योजनांचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे. याकरीता मिरा भाईंदर महानगरपालिका स्थायी समिती सदस्यांचा अभ्यास दौरा माहे एप्रिल अखेरीस दार्जिलिंग - सिक्कीम येथे आयोजित करण्याचे निश्चित करण्यात येत आहे. सदर दौयाकरीता प्रशासनाने आवश्यक मंजूया प्राप्त करुन घ्याव्यात. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. स्थायी समितीचे अंदमान निकोबार व काश्मिर येथे यापूर्वी अभ्यास दौरे आयोजित करण्यात आले होते. सदर दौरा यापूर्वी मे. पिरॅमिड ट्रॅव्हल्स या एजन्सीने यशस्वीरित्या आयोजित केले होते. तरी दार्जिलिंग - सिक्कीम या दौयाकरीता अपेक्षित रु. १८,००,०००/- खर्चाच हि सभा मान्यता देत असुन सदर दौयाचे आयोजनासाठी मे. पिरॅमिड ट्रॅव्हल्स यांनी प्रस्ताव दिलेला आहे. तरी प्रस्तावात त्यांनी सादर केलेल्या रु. ९०,०००/- प्रति माणसी दराने नेमणूक करण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची “ड” मधील प्रकरण ५(२)(२) अन्वये प्राप्त अधिकारात मा. आयुक्त यांना ही सभा प्राधिकृत करीत आहे. सदर दौऱ्याकरीता आवश्यक रक्कम मे. पिरॅमिड ट्रॅव्हल्स यांना आगाउ स्वरुपात देण्यात यावी.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. संदीप पाटील**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**बर्नड डिमेलो :-**

प्रकरण क्र. ४७ ते ५० हे विषय अंदाजपत्रकास स्थायी समितीची मान्यता देण्यासाठी आजच्या विषयपत्रिकेवर आहेत. सदर अंदाजपत्रकात काही सुचना करणे व विचार विनिमय करुन मान्यता देण्यासाठी आजची सभा तहकुब करण्यात येत आहे. तहकुब स्थायी समिती सभा सोमवार दि. ११/०३/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करावी असा मी ठराव मांडत आहे.

**राजेश वेतोसकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. ४२अ :-**

प्रकरण क्र. ४७ ते ५० हे विषय अंदाजपत्रकास स्थायी समितीची मान्यता देण्यासाठी आजच्या विषयपत्रिकेवर आहेत. सदर अंदाजपत्रकात काही सुचना करणे व विचार विनिमय करुन मान्यता देण्यासाठी आजची सभा तहकुब करण्यात येत आहे.

तहकुब स्थायी समिती सभा सोमवार दि. ११/०३/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

आजची सभा तहकुब करीत आहे.

**(सभा तहकुब केल्याची वेळ दुपारी ०१.१५ वा.)**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**